महा-ई-सेवा केंद्रामार्फत ई-७/१२ उतारा
जनतेस उपलब्ध करुन देण्याबाबत -

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०१०/प्र.क्र.६३/ल-१सेल
महसुल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: - २७ एप्रिल, २०१०

वाचा :- १) सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.मातंसं/प्र.क्र.२८/३९, दि. ३ डिसेंबर २००८
२) सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती ०८/प्र.क्र.११०/३९, दि. २३ जून २००९

प्रस्तावना -

सामान्य जनतेला विविध शासकीय सेवा मिळविण्यासाठी लागणारा श्रम, वित्त व वेळ यांचा अपव्यय टाळून त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विहित मुदतीत विविध विभागांच्या सेवा महा-ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपरोक्त संदर्भाधीन एका शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. नागरिकांपर्यंत शासकीय, निमशासकीय व खाजगी सेवा पुरविण्यासाठी प्रत्येक सहा गावांकरीता एक या प्रमाणात महा-ई-सेवा केंद्र सुरु करुन सर्व सेवा जनतेला विनासायास व कमी श्रमात खाजगी संस्थेकडून उपलब्ध करुन देण्याची सदर योजना दिनांक ३ डिसेंबर २००८ पासून सुरु झालेली आहे. महाराष्ट्रात ११,८१८ महा-ई-सेवा केंद्र सुरु करण्याची कारवाई सुरु असून ३,९९४ महा-ई-सेवा केंद्र सध्या कार्यरत आहेत.

महा-ई-सेवा केंद्राव्दारे ई-७/१२ उपलब्ध करुन देण्याविषयी मा.मुख्यमंत्र्यांनी घोषणा केलेली होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

शासन निर्णय -

जिल्हयातील सर्व्हिस सेंटरचा प्रतिनिधी हा निवासी उप जिल्हाधिकारी यांच्याकडून सुधारीत ७/१२ आणि ८-अ उता-याची माहिती नॉन एडिटेबल सीडी वर घेऊन महा-ई-सेवा केंद्र चालकास उपलब्ध करून देईल. या सीडीतून महा-ई-सेवा केंद्रामार्फत नागरिकास ७/१२ आणि ८ अ चा उतारा दिला जाईल व सदर उता-यास प्रतीवर महा-ई-सेवा केंद्रचालक हा (परिशिष्ट अ प्रमाणे) काऊंटर स्टॅप मारून देईल व या प्रतीवर संबंधित तलाट्याच्या सहीची आवश्यकता राहणार नाही. या प्रतीच्या सत्यतेची पडताळणी http:/ mahabhulekh.mumbai.nic.in या संकेत स्थळावर करता येईल. ह्या प्रतीवर सीडी अपडेट झाल्याची तारीखसुध्दा राहील. ७/१२ आणि ८-अ उता-याची सुधारीत माहिती http:/ mahabhulekh.mumbai. nic.in या संकेतस्थळावर अपलोड करण्याची जबाबदारी तहसिलदार यांची राहील.

या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आली असुन त्याचा संगणक संकेतांक **२०१००४२८१८१२२२००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एम.रमेशकुमार)
(एम. रमेशकुमार)
अपर मुख्य सचिव

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,

उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्यसचिव यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,
सर्व विभागीय आयुक्त, /सर्व जिल्हाधिकारी,/ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान परिषद /विधान सभा),मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई / लेखाकोष भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
निवड नस्ती (२ प्रती).

परिशिष्ट - अ

महा-ई-सेवा केंद्रातून देण्यात येणाऱ्या ई-७/१२ उताऱ्याच्या प्रतीवर उमटविणारा शिक्क्याचा नमुना

महा-ई-सेवा केंद्र (CSC)

दिनांक : **गाव :**

तालुका : **जिल्हा :**

महा-ई-सेवा केंद्राचा कोड :

महा-ई-सेवा केंद्र चालकाचा कोड :

मोबाईल नंबर : **सही -----------------------**

ई-७/१२ प्रतीची सत्यतेची पडताळणी 'mahabhulekh.mumbai.nic.in' या संकेतस्थळावर करता येईल.

Printed at 'Maha e-Sevakendra' (CSC)

Date: **Village:**

Taluka: **District:**

CSC Location Code:

CSC Operator Code:

Name of the VLE:

Mobile No.: **Sign: ---------------------------**

Authenticity of this document can be verified on 'mahabhulekh.mumbai.nic.in'

<u>परिशिष्ट - ब</u>

महा-ई-सेवा केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या ई-७/१२ उताऱ्याची शिक्क्यासहीत प्रत

अधिकार अभिलेख पत्रक

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम , १९७१ यातील नियम ३, ५, ६ आणि ७]

गाव : विष्णूपुरी — तालुका : नांदेड — जिल्हा : नांदेड

गट क्रमांक / गट क्रमांकाचा उपविभाग / भूधारणा पध्दती	भोगवटादाराचे नाव	
भोगवटादार वर्ग -१ १६२ शेताचे स्थानिक नाव अंब्याचं	क्षेत्र — आकार — आणे पै — पो.ख. — फे.फा.	खाते क्रमांक
लागवडी योग्य क्षेत्र हे. आर.चौ.मी. जिरायत १.३२.०० एकूण १.३२.०० पोटखराब (लागवडी अयोग्य) वर्ग (अ) वर्ग (ब) एकूण आकारणी ५.६७ जुडी किंवा विशेष आकारणी	गोविंदा शंकर ०.२५.०० १.२६ (१३०४) हरिश्चंद्र भगवानराव हंबर्डे ०.८१.०० ४.०९ (१२८६) वामन शंकर ०.२५.०० १.३२ (१३०४)	१५,७३०,७३४ कुळाचे नाव इतर अधिकार राष्ट्रीयकृत बँक गहाण हरिश्चंद्र भगवानराव हंबर्डे (१६१८) यांच्या नावे मराठवाडा ग्रामीण बँक शाखा विष्णूपुरी ता.जि.नांदेड कर रु. रु.१५००० चा बोजा ठेवण्यात आला राष्ट्रीयकृत बँक गहाण गोविंद शंकरराव हंबर्डे यांचा हिस्सा (१७८५) मराठवाडा ग्रामीण बँक शाखा विष्णूपुरी यांच्या कडे १२०००/- रु साठी गहाण. राष्ट्रीयकृत बँक गहाण वामन शंकर हंबर्डे यांचा हिस्सा मराठवाडा ग्रामीण बँक शाखा विष्णूपुरी यांच्या कडे २००००/- रु साठी गहाण. (१९४६) सीमा आणि भूमापन चिन्हे

Printed at 'Maha-e-Seva Kendra' (CSC)
Date: Village: Vishnupuri
Taluka: Nanded District: Nanded
CSC Location Code: 00010
CSC Operator Code: OPR123
Name of the VLE: Kuldeep Joshi
Mobile No. 9819426202 Sign:
Authenticity of this document can be verified on 'mahabhulekh.mumbai.nic.in'

गाव नमुना बारा

पिकांची नोंदवही

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम , १९७१ यातील नियम २९]

वर्ष	हंगाम	पिकाखालील क्षेत्राचा तपशील — मिश्र पिका खालील क्षेत्र — मिश्रणाचा संकेत क्रमांक — जल सिंचित	अजल सिंचित	घटक पिके व प्रत्येका खालील क्षेत्र — पिकाचे नाव	जल सिंचित	अजल सिंचित	निर्भेळ पिकाखालील क्षेत्र — पिकाचे नाव	जल सिंचित	अजल सिंचित	लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन — स्वरूप	क्षेत्र	जल सिंचनाचे साधन	शेरा
२००४-०५	खरीप		सोयाबीन		१.००					२००४-०५ पडीत	०.३२.००	बोरवेल	
२००५-०६	खरीप		सोयाबीन		१.३०.००					२००५-०६ पालुपड	०.०२.००		
२००६-०७	खरीप		सोयाबीन		१.३०.००					२००६-०७ पालुपड	०.०२.००		
२००७-०८	खरीप		सोयाबीन		१.२०.००					२००७-०८ पालुपड	०.१२.००		
२००८-०९	खरीप		सोयाबीन		१.३०.००					२००८-०९ पडीत	०.०२.००		
२००९-१०	खरीप		सोयाबीन		[illegible]					२००९-१० पालुपड	०.०२.००		

Printed at 'Maha-e-Seva Kendra' (CS[illegible]
Date: Village: Vishnup[illegible]
Taluka: [illegible] District: [illegible]nded
CSC [illegible]
CSC [illegible]
Name [illegible]
Mobile [illegible]
Authentic[illegible] be

"ATTESTED"